# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य,
## ४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : prash.dhepune@nic.in

---

क्र. उशिसं/प्रशा-२/टे.५/कंत्राटी वाहनचालक/ई-२६४२५९ दि. १० डिसेंबर, २०२४

-: नोटीस :-

विषय :- उच्च शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयासाठी अनुज्ञेय शासकीय वाहनांसाठी दोन वाहनचालकांच्या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत घेण्याकरीता दरपत्रके मागविणेबाबत.

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयासाठी अनुज्ञेय शासकीय वाहनांसाठी दोन (०२) वाहनचालकांच्या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत घेण्याकरीता शासन पत्र क्र. वाहन-२०२३/प्र.क्र. १०७/मशि-१, दि. ४ सप्टेंबर, २०२४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयातील शासकीय वाहनांसाठी दोन (०२) वाहनचालकांच्या सेवा घेण्याकरीता पात्र कंत्राटदार / पुरवठादार यांचेकडून बंद पाकिटात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सबब सर्व संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांनी यासोबत प्रसिध्द केलेल्या निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्यास तांत्रिक व दरपत्रकाचे स्वतंत्र लिफाफे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ (०८) दिवसांपर्यत संचालनालयाच्या खालील पत्त्यावर सादर करावे. सदर बंद लिफाफ्यावर **प्रशासन अधिकारी, प्रशा-२, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे** असे नमूद करावे.

**संचालनालयाचा पत्ता :-**

मा. संचालक,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

सदरची नोटीस संचालनालयाच्या नोटीस बोर्ड तसेच संकेतस्थळ www.dhepune.gov.in यावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 10-12-2024 16:58:42
(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयासाठी अनुज्ञेय शासकीय वाहनांसाठी दोन वाहनचालकांच्या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत घेण्याकरीता दरपत्रके मागविणेबाबत.

---

निविदेच्या अटी :-

१. उच्च शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयासाठी दोन वाहनचालकाची पदे बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत असून, तांत्रिक व दराचा स्वतंत्र लिफाफा सिलबंद करुन प्रसिध्दीपासून आठ (०८) दिवसांत इच्छूक पात्र संस्थेने सादर करावा.

२. तांत्रिक अटी पूर्ण करणाऱ्या पात्र निविदा धारकाच्या दराचेच लिफाफे विचारात घेण्यात येतील.

३. तांत्रिक बाबींची पूर्तता करुन पात्र ठरणाऱ्या संस्थेपैकी जी संस्था दरपत्रकामध्ये (वेतन + सेवाशुल्क) यासह एकूण वेतन कमी नमूद करेल त्या संस्थेस L१ घोषीत करुन इतर अटींची पूर्तता करीत असल्यास संबंधित संस्थेची निवड करुन त्यास पुरवठा आदेश देण्यात येईल.

४. सदर पुरवठा आदेश हे जास्तीत जास्त ११ महिने करीता राहतील, तथापि आवश्यकतेनुसार त्यापूर्वी कोणतीही पूर्वसुचना न देता सदर पुरवठा आदेश रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील. तसेच पुरवठा दाराची सेवा समाधानकारक असल्यास आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात येईल.

५. संस्थेची मागील तीन वर्षाची सरासरी वार्षीक उलाढाल किमान रु. ५०.०० लक्ष इतकी असणे अनिवार्य आहे.

६. बाह्ययंत्रणेद्वारा नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी वाहनचालकांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायीत्व शासनावर राहणार नाही.

७. कंत्राटदार / पुरवठादार यांना संबंधित कंत्राटी वाहनचालकास किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील.

८. कंत्राटदारास निश्चित केल्यानुसार ठोक मानधन रक्कम अदा करण्यात येईल. संस्थेच्या सेवाशुल्काची रक्कम स्वतंत्रपणे अदा करण्यात येणार नाही. निश्चित केलेल्या ठोक मानधनाच्या रक्कमेमध्ये संस्थेच्या सेवाशुल्काचा समावेश राहील.

९. कंत्राटदारास संबंधित कंत्राटी वाहनचालकाच्या वेतनातून कायद्यानुसार आवश्यक EPF/ ESIS इत्यादी भरणा करणे बंधनकारक राहील. त्याबाबतचा तपशिल दरमहा वेतन अदायगीकरीता या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

१०. कंत्राटदाराने महिना संपल्यास पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संबंधित कंत्राटी वाहनचालकाच्या उपस्थिती प्रमाणपत्रासह देयक सादर करावे. देयक पारीत झाल्यानंतर रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात येईल. त्यामधून नियमानुसार बंधनकारक असलेल्या शासकीय कपाती जसे आयकर, GST इत्यादी करण्यात येतील.

११. देयक पारित होण्यापूर्वी वाहनचालकाचे मासिक पारिश्रमिक आगाऊ स्वरुपात कंत्राटदाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित कंत्राटी वाहनचालकाच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक राहील.

१२. कंत्राटी वाहनचालकास दैनंदिन काम करताना काही इजा, हानी व मृत्यु झाल्यास संबंधित नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. तसेच त्यास झालेल्या इजा व नुकसान भरपाईचे दायित्व शासनावर राहणार नाही. त्यानुसार संबंधित कंत्राटी वाहनचालकाचा विमा संबंधित कंत्राटदाराने उतरविणे अनिवार्य राहील.

१३. कंत्राटी वाहनचालकास नियमित शासकीय कर्मचारी यांचे नियम / अटी व शर्ती लागू असणार नाहीत. नियमित कर्मचारी यांचेप्रमाणे त्यांना कोणतेही वेतन, भत्ते व अनुषंगिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत व त्यांच्या सेवेचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही.

१४. कंत्राटदाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास किंवा विहित वेळेत वाहनचालक उपलब्ध करुन न दिल्यामुळे अन्य मार्गाने वाहनचालक उपलब्ध करण्याकरीता काही परिश्रमिक द्यावे लागल्यास ती रक्कम कंत्राटदाराच्या प्रलंबित देयकातून कपात करण्यात येईल.

१५. कंत्राटी वाहनचालकाच्या अनुपस्थितीच्या दिवशी कंत्राटदाराने पर्यायी व्यवस्था करुन दिली पाहीजे.

१६. पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी वाहनचालकाबाबत अर्हता व इतर अटी-शर्ती

- वाहनचालक किमान इ. १० वी उत्तीर्ण असावा. त्याला मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक राहील. तो महाराष्ट्राचा अधिवास धारक असावा.
- सदर वाहनचालकाकडे मोटार वाहन कायद्यानुसार आवश्यक जीप / कार चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे.
- वाहनचालकाचे वय १८ वर्षे पूर्ण असावे व ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
- वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.
- संस्थेतर्फे पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. वाहनचालकाने पोलीस तपासणी अहवाल देणे बंधनकारक आहे.
- वाहनचालकास वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.
- वाहनचालक शारिरीकदृष्ट्या सक्षम असावा. त्याची वागणूक विनम्रतेची आणि सहकार्याची असावी.
- वाहनचालकाची वैयक्तीक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. आधारकार्ड, शैक्षणिक अर्हता कागदत्रे, सध्याचा व कायमचा पत्ता आदी.
- सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी स्वरुपाची असेल. या पदावरील कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
- वाहनचालकास प्रत्येक दिवसाचा कामकाजाचा कालावधी ९.४५ तास इतका राहील.
- कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळे व्यतीरिक्त वाहनचालकास काम करणे आवश्यक राहील.
- आवश्यकता भासल्यास सुट्टीच्या दिवशी कामकाजावर बोलावण्यात येईल.
- वाहन स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे ही कंत्राटी वाहनचालकाची जबाबदारी असेल.
- कंत्राटी वाहनचालकास शासकीय कामानिमित्त आवश्यकतेनुसार पुणे जिल्ह्याबाहेर देखील वाहन चालवावे लागेल.

- वाहन चालकाने कामावर असताना धुम्रपान, नशापान व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करता कामा नये.
- वाहनचालकाची निवड व मानधनाबाबत संबंधित बाह्ययंत्रणेद्वारे देण्यात येणार आहे. सबब कंत्राटी वाहनचालकाने थेट या कार्यालयाकडे केलेल्या कोणत्याही मागणीचा विचार केला जाणार नाही.
- वाहनचालकास संबधित बाह्ययंत्रणेद्वारे मानधन अदायगी करण्यात येईल. त्यास कामकाजाचा कोणत्याही स्वरुपाचा अतिकालीन भत्ता देय राहणार नाही.

१७. शासनाने वेळोवेळी बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी कर्मचारी नेमणूकीसंदर्भात निश्चित केलेल्या अटी बंधनकारक राहतील.

१८. कराराचे पालन समाधानकारकपणे न झाल्यास करार केव्हाही संपुष्टात आणणे, तसेच कराराची मुदत वाढविणे याबाबतचा निर्णय या कार्यालयाचा राहील.

---------------------------------------------------------------------------------------

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयासाठी अनुज्ञेय शासकीय वाहनांसाठी दोन वाहनचालकांच्या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत घेण्याकरीता दरपत्रके मागविणेबाबत.

---

**तांत्रिक लिफाफा क्र. १ :- (तांत्रिक अटी)**

निविदे सोबत सादर करण्यात येणाऱ्या तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रे स्वयंसाक्षरीत करुन बंद लिफाफ्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

१. संबंधित संस्था (कंपनी कायदा / दुकाने अधिनियम ) अंतर्गत नोंदणीकृत असावी. संस्था नोंदणी पत्राची नूतनीकरण केलेली अद्ययावत प्रत जोडणे आवश्यक राहील.
२. कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७० अंतर्गत संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
३. संस्थेचे EPFO अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र
४. संस्थेचे ESIC अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र
५. संस्थेचे GST नोंदणी प्रमाणपत्र
६. संस्थेचे PAN कार्ड
७. संस्थेच मागील ३ वर्षाचे (सन २०२३-२४, सन २०२२-२३ व सन २०२१-२२) आयकर विवरणपत्र.
८. GST RETURN OF LAST QUARTER FY २०२३-२४
९. सनदी लेखापाल यांचे मागील ३ वर्षाचे (सन २०२३-२४, सन २०२२-२३ व सन २०२१-२२) वार्षीक उलाढाल प्रमाणपत्र.
१०. निविदा सादर करणारी संस्था काळ्या यादीत समावेश नसल्याचे संस्थेचे स्वयंघोषणापत्र.

---

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयासाठी अनुज्ञेय शासकीय वाहनांसाठी दोन वाहनचालकांच्या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत घेण्याकरीता दरपत्रके मागविणेबाबत.

---

**दरपत्रकाचा लिफाफा क्र. ०२ :-**

| अ.क्र. | बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करावयाच्या मनुष्यबळाचा तपशिल | उपलब्ध करावाच्या मुनष्यबळाची संख्या | प्रती कंत्राटी वाहनचालकास अदा करावयाचे प्रतीमहा मानधन दर रुपयामध्ये | संस्थेने आकारावयाचे सेवाशुल्क रुपयामध्ये | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ (४+५) |
| १ | उच्च शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयासाठी दोन (०२) कंत्राटी वाहनचालक | ०२ | ------------ | ----------- | ------- |

टिप : १. संस्थेने दर नोंदविताना किमान वेतन कायद्यानुसार देय वेतन विचारात घेण्यात यावे.

२. ज्या संस्थेचे मानधन व सेवाशुल्क यासह एकूण रक्कम कमी असेल अशा संस्थेस L१ घोषीत करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर दरपत्रक संस्थेचा नोंदणी क्रमांक, GST नंबर नमुद असलेलया लेटरहेड वर शिक्का व स्वाक्षरीसह निविदा धारकाने देणे बंधनकारक आहे.

प्राधिकृत अधिकारी यांचे नाव व सही
(संस्थेच्या शिक्का सह)